A-V
मराठी इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या सोलापूर जिल्हयातील भीमा नदीवरिल दक्षिण सोलापूर, पंढरपूर व अक्कलकोट तालुक्यातील प्रस्तावित ०३ (तीन) वाळूस्थळ साठ्याच्या जाहिर लिलावासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृत**

प्रकल्प प्रवर्तक जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या **सोलापूर जिल्हयातील भीमा नदीवरिल दक्षिण सोलापूर, पंढरपूर व अक्कलकोट तालुक्यातील प्रस्तावित ०३ (तीन) वाळूस्थळ साठ्याच्या जाहिर लिलावासाठी जसे की -**

| अनु. क्रं. | नदी | वाळू स्थळ साठा | तालुका | जिल्हा | गट नं. | क्षेत्रफळ (हेक्चर) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | भीमा | भंडार कवठे | दक्षिण सोलापूर | सोलापूर | ८२९, ७९१ ते ७९७ | ४.२० |
| २) | भीमा | चळे | पंढरपूर | सोलापूर | ३९९.४०१/१,४०१/१/२/१, ४०१/२/२,४०२,४१०,४१३,४१४/२ब, ४१४/१ | ४.५० |
| ३) | भीमा | खानापूर | अक्कलकोट | सोलापूर | २२५ ते २३४, २३५ ते २४०, २४३, २५९ | ४.५० |

पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बुधवार, दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी ११.४५ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

जिल्हाधिकारी, यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास बुधवार, दिनांक १३ एप्रिल, २०२२ रोजी ११.४५ वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-२३ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी- १२०३२५- एफटीएस-०१९७ दिनांक २५ मार्च, २०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी,सोलापूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| **२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी- प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर | - | **आयोजक** |

श्री अजित वसंतराव पाटील, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सोलापूर तथा आयोजक, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सौ शमा पवार, अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री शंकर एल. वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

आयोजक यांनी सांगितले कोविड-१९ संसर्गजन्य साथीच्या पार्श्वभूमीवर सदरहू जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली असून केंद्र व राज्य शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांनुसार बैठकीच्या स्थानी एकावेळी फक्त १०० व्यक्तींनाच एका सत्रात परवानगी देण्यात आलेली असून जर उपस्थितांची संख्या जास्त असल्यास त्यांना पुढील सत्रात संधि देण्यात येईल व सर्व उपस्थितांना जनसुनावणी बैठकीत संधि मिळेपर्यंत बैठक चालू ठेवण्यात येईल. आयोजक यांनी पुढे सांगितले की कोविडच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी काही निर्देश पारित करण्यात आले. त्यानुसार प्रत्येक व्यक्तिचे शारीरीक तापमान तपासणे व सॅनिटायझरचा वापर बैठकीच्या प्रवेशव्दारावर करण्यात आलेला असून बैठकीच्या स्थानावर प्रत्येक व्यक्तीने मुखपट्टी (मास्क) घालणे व दोन व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ठेवणे बंधनकारक असल्याने ते निर्देश पाळण्याची सूचना केली.

आयोजक यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या अधिसूचना क्रं. १५३३, दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार तसेच पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र संकीर्ण २०१९/प्र.क.०१/तां.क. ३-१२-२०१९ नुसार गौण खनिज (वाळू गट) बी-१ संवर्गात

समाविष्ट केल्याने अशा प्रकल्पांना महाराष्ट्र शासनाची पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

श्री अजित पाटील, आयोजक यांनी असे सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय , जिल्हा-सोलापूर, महाराष्ट्र यांच्या सोलापूर जिल्ह्यातील भीमा नदीवरिल दक्षिण सोलापूर, पंढरपूर व अक्कलकोट तालुक्यातील प्रस्तावित ०३ (तीन) वाळूस्थळ साठ्याच्या जाहिर लिलावासाठी पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीआयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्पामुळे विस्थापीत होणा-या रहिवाश्यांच्या समस्या जाणून घेणे, प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

वरिल पर्यावरण अधिसुचनेनुसार एक महिना अगोदर स्थानिक वृत्तपत्रात पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी सूचना देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर यांनी स्थानिक वृत्तपत्र दैनिक संचार यात मराठीत दिनांक १३ मार्च, २०२२ रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक १२ मार्च, २०२२ रोजी जाहिर जनसुनावणी सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात सामान्य जनतेस उपरोक्त प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या लेखी स्वरुपात नोंदविण्याचे आवाहन करण्यात आले होते.

त्याचप्रमाणे नियोजित प्रकल्पाविषयीचा कार्यकारी सारांश अहवाल यांच्या प्रती विभागीय कार्यालय - पर्यावरण, वने व जल वायू परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर, मा. जिल्हाधिकारी कार्यालय - सोलापूर, मा. अपर जिल्हाधिकारी कार्यालय - सोलापूर, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सोलापूर, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र - सोलापूर, जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,सोलापूर, प्रांतअधिकारी/उप विभागीय अधिकारी,पंढरपूर, तहसीलदार, तहसील कार्यालय - दक्षिण सोलापूर, तालुका - दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय - पंढरपूर, तालुका -जिल्हा- सोलापूर, तहसीलदार, तहसील कार्यालय-अक्कलकोट, तालुका - अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पंढरपूर, जिल्हा-सोलापूर, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर, ग्रामसेवक/सरपंच, ,ग्रामपंचायत, कार्यालय - मौजे भंडारकवठे, तालुका-दक्षिण सोलापूर, जिल्हा-सोलापूर, ग्रामपंचायत, कार्यालय - मौजे चळे, तालुका-पंढरपूर, जिल्हा-सोलापूर
ग्रामपंचायत, कार्यालय - मौजे खानापूर, तालुका-अक्कलकोट, जिल्हा-सोलापूर, मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - मुंबई, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - पुणे, उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ - सोलापूर व मप्रनि मंडळाच्या संकतेस्थळावर सामान्य जनतेसाठी उपलब्ध करण्यात आलेले होते.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणीय आक्षेप, हरकती, सूचना असल्यास त्या उपस्थित करण्याची संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात सादरीकरणानंतर देऊ शकतात असे सांगितले.

प्रकल्प प्रवर्तकांच्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) बाबत माहिती देताना सांगितले की सदरहू ०३ वाळू गट उत्खननासाठी तेथील संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाने ना हरकत प्रमाणपत्र अदा केलेले असून उत्खनन हे राज्य पर्यावरण समितीने ठरवून दिलेल्या कालावधीपर्यंतच केले जाईल. त्याचप्रमाणे मान्सून कालावधीत म्हणजे १० जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत उत्खनन करण्यात येणार नाही. सदरहू प्रकल्पाचा खाणकाम आराखडा हा केंद्र शासनाच्या भूविज्ञान व खनिकर्म संचानालय, नागपूर यांनी मंजूर केलेला आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांचे आक्षेप, सूचना, टीकाटिप्पणी असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. प्रश्नकर्त्याने आपले संपूर्ण नांव व पता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री अजित वसंतराव पाटील,आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-**

आयोजक यांनी टारपोलिनबाबत प्रश्न विचारला की आपण जेव्हा टारपोलिनच्या सहायाने वाहतुक करणार, त्यावर लक्ष ठेवण्यासाठी आपण ग्रामपंचायतीचा सदस्य नेमणार आहात का?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की गावपातळीवर नियमाप्रमाणे दक्षता समिती असते. ती दक्षता समिती स्थापन करण्यात आलेली आहे. त्यांनी सांगितल की जे काही वाळू उत्खनन केले जाते, त्याच्यावर देखरेख ठेवणे हे त्यांचे काम आहे.

आयोजक यांनी उप-प्रश्न विचारला की दक्षता समितीमध्ये किती सदस्य असतात?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की गावाचे सरपंच, पोलिस पाटील हे सदस्य आहेत. त्यांनी पुढे माहिती की ग्राम दक्षता समितीत ग्रामपंचायतीचे सरपंच हे अध्यक्ष तर ग्रामसेवक, पोलिस पाटील, कोतवाल हे सदस्य आहेत, तर गावचा तलाठी हे सदस्य सचिव आहे. आयोजक यांनी मत मांडले की उत्तरामुळे त्यांचे समाधान झालेले आहे. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

२) **श्री शिवानंद विठ्ठल देवणगाव, सरपंच, खानापूर ग्रामपंचायत, जिल्हा-सोलापूरः-**

**श्री शिवानंद देवणगाव** यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की ग्रामपंचायत हद्दीत २०१५, २०१६ व २०१७ साली वाळूचा लिलाव झालेला आहे. नियमाप्रमाणे एकूण महसुलाच्या ६०% ग्रामपंचातीस निधी उपलपब्ध करणे आवश्यक आहे. तो अद्याप पावतो ग्रामपंचायतीस उपलब्ध झालेला नाही. आयोजक यांनी जिल्हा खनिकर्म कार्यालय, सोलापूर यांच्या प्रतिनिधीस स्पष्टीकरण करण्याची सूचना केली. प्रतिनिधी, जिल्हा खनिकर्म कार्यालय, सोलापूर यांनी सांगितले की जिल्हा खनिज प्रतिष्ठान समितीतर्फे निधी उपलब्ध करण्यात येतो. तो १०% असतो. जिल्हा खनिकर्म कार्यालयाच्या पुढील बैठकीत हा मुद्दा ठेवण्यात येईल. आयोजक यांनी जिल्हा खनिज प्रतिष्ठान समिती ची माहिती विचारली असता प्रतिनिधी, जिल्हा खनिकर्म कार्यालय, सोलापूर यांनी सांगितले की जिल्हा खनिज प्रतिष्ठान समितीचे अध्यक्ष हे जिल्हाधिकारी तर प्रतिष्ठानचे सदस्य सचिव हे जिल्हा खनिकर्म अधिकारी (District Mining Officer) हे असतात. तर जिल्हयातील आमदार, खासदार हे सदस्य असतात.

**३) श्री दयानंद विठ्ठल खोबण, ग्रामविकास अधिकारी, खानापूर, जिल्हा - सोलापूरः-**

श्री खोबण यांनी सांगितले की २०१६-१७ साली खानापूर ग्रामपंचायतीच्या हद्दीतील भीमा नदीपात्रातील वाळूचे उत्खनन झालेले आहे. खानापूर व बाजूचे गांवा अंकली या गावाच्या मधील नदीपात्रातील वाळूचा १८.५ कोटीला लिलाव देण्यात आला होता. त्या लिलावातून दोन्ही ग्रामपंचायतीस (खानापूर व अंकली) विकास निधी मिळणे आवश्यक होते. सदरहू ग्रामपंचायतीतर्फे तीनवेळा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तो विकास निधी अद्यापपावेतो ग्रामपंचायतीस मिळालेला नाही.

श्री खोबण यांनी पुढे सांगितले की त्यावेळी वाळू उत्खनन होताना जी वाहतुक झाली, त्यामुळे तडवळ ते खानापुर जो ५ कि.मीचा रस्ता आहे पूर्णपणे खराब झालेला आहे. त्यावेळी आयोजक यांनी रस्त्याची मालकीबाबत विचारणा केली असता श्री खोबण यांनी सदरहू रस्त्याची मालकी ही जिल्हा परिषद याच्यांकडे आहे असे सांगितले. खानापूरला माध्यमिक शाळा नाही. त्यामूळे त्या रस्त्याचा वापर शाळा, कॉलेजचे विद्यार्थी सायकलने किंवा पायी तडवळला जाऊन करतात. त्याचप्रमाणे वाळू उत्खनन करत असताना जी वाहतुक होते, ती ओव्हर-लोडींग असते. ट्रक्सचे वाहनचालक हे वाहतुकीचे कुठलेच नियम पाळत नाहीत. गावातील महिला कपडे धुण्यासाठी त्या रस्त्यावरुन जातात. त्यामुळे शाळेतील मुलांना, गावक-यांच्या जीविताला धोका आहे. सर्व वाळू ही चोरुन नाली जाते. त्याचप्रमाणे रात्री वाळूची वाहतुक करण्यात येते.

श्री खोबण यांनी पुढे मागणी केली की नदीपात्रात आमच्या पाणीपुरवठ्याची विहिर आहे. तरी विहिरीजवळील भागात वाळूचे उत्खनन करण्यात येऊ नये. आयोजक यांनी प्रतिनिधी, जिल्हा खनिकर्म विभाग, सोलापूर यांना नदीपात्रात पाणीपुरवठ्याची विहिरी आहेत, तरी विहिरी जवळील भागात वाळूचे उत्खनन करण्यात येऊ नये या मुद्द्याची विशेष नोंद घेण्याची सूचना केली.

श्री खोबण यांनी पुढे आक्षेप नोंदविला की खानापूर, अंकली ग्रामसभेने तीन वेळा ठराव मंजूर करून विकास निधी उपलब्ध करण्याची मागणी केलेली आहे. तरी याबाबत पुढील कार्यवाही त्वरित करावी ही विनंती.

यावेळी आयोजक यांनी बैठकीत सांगितले की वरिल चारही मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. मात्र सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने प्रस्तावित वाळू उत्खनन प्रकल्पामुळे स्थानिक पर्यावरणावर होणारा प्रस्तावित आघात व त्यासाठी कराव्या लागणा-या उपाय योजनांची माहिती स्थानिकांना देऊन त्यांचे आक्षेप/सूचना नोंदविण्यासाठी आहे. तरी पर्यावरणविषयक सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन आयोजक यांनी केले.

४) **श्री अबू सुफियान शेख, राहणार-सोलापूर,जिल्हा-सोलापूरः-**

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास समर्थन आहे.

५) **श्री अमर जाधव, राहणार-सोलापूर, जिल्हा-सोलापूरः-**

हा प्रकल्प नवीन रोजगाराच्या संधि मिळण्यासाठी फायदेशीर आहे. त्याचप्रमाणे जिल्ह्याच्या विकासासाठी फायदेशीर आहे. जी बांधकामे थांबलेली आहेत, त्यांनी वाळू मिळाल्यामुळे ती बांधकामे परत चालू होतील.

पर्यावरणविषचक जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना काही पर्यावरणविषयक मुद्दा असल्यास तो नोंदविण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडून कोणताच प्रतिसाद नव्हता. आयोजक, पर्यावरणविषचक जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प सल्लागार यांनी सांगितले ही बैठकीतील सर्व मुद्द्यांची नोंद घेण्यात आली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. त्यांनी प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांना सुधारित पर्यावरण व्यवस्थापन योजना तयार करण्याची सूचना केली व मा. अध्यक्षा यांना बैठकीचा समारोप करण्याची विनंती केली.

अध्यक्षा, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समारोप करताना सांगितले की सदरहू जनसुनावणी ही रेती घाटाच्या उत्खनानामुळे होणा-या संभाव्य पर्यावरणावरिल परिणामाबाबत होती. यात स्थानिकांनी त्यांच्या अडचणी उपस्थित केल्या. नदीपात्रातील पाणीपुरवठा

(31)

विहिरीजवळील वाळू उत्खननाचा विषय, ग्रामविकास निधी उपलब्ध न होणे याबाबत मुद्दे उपस्थित करण्यात आले. या अडचणी, मुद्दे दुस-या गावात जेथे वाळू उत्खननास परवानगी देण्यात आलेली आहे, तेथे असू शकतात. अध्यक्षा यांनी या मुद्द्यांची नोंद जिल्हा खनिकर्म अधिकारी यांनी घेऊन त्याबाबत पुढील कार्यवाही करण्याची सूचना केली. अध्यक्षा यांनी रात्री वाळूचे उत्खनन व वाहतुक, वाळूचोरी याबाबत जिल्हा प्रशासन गंभीरपणे पुढील कार्यवाही करेल असे सांगितले व उपस्थितांचे आभार मानून जनसुनावणी ही संपन्न झाल्याचे घोषित केले .मा. अध्यक्षांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(अजित पाटील)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
सोलापूर

**(शंकर वाघमारे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
पुणे

**(शमा पवार)**
अध्यक्षा,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, सोलापूर,
जिल्हा-सोलापूर